## परिशिष्ट २

# प्रश्नावली

**प्रश्न १)** सर मी तुमच्या कादंबरीवर एम. फिल करीत आहे. त्यादृष्टीने तुमची मुलाखल घेत आहे. मला आपले जीवनचरित्र सांगा. (आई—वडिल,बहिण—भाऊ यांच्याविषयी माहिती तुमचा पारंपरिक उदयोग प्राथमिक शिक्षण माध्यामिक शिक्षण, १०वी, १२वी, बी.एस्सी, बी. एड, पर्यंतचे शिक्षण कसे घेतले ? तुम्ही कसे घडला? एक उत्कृष्ट लेखक कसे झाला? याविषयी भरपूर माहिती द्या.

**उत्तर** माझे पूर्ण नाव बाबाराव गंगाराम मुसळे. आईचे नाव कलावतीबाई. सध्या फक्त वडील हयात आहेत. माझे मूळ गाव ब्रम्हा. हे वाशिम पुसदरोडवर वाशिमपासून अठरा किलोमीटरवर आहे. मुख्य रोडपासून दिड किलोमीटर आत आहे. मला दोन भाऊ (एक माझ्यापेक्षा मोठे, एक लहान) आहेत. तीन बहिणी (सर्वच लहान) आहेत. मोठे भाऊ प्रायमरी शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले. लहान भाऊ नववा वर्ग शिकून सध्या शेती करतो ...... बहिणी शेतकऱ्यांच्या घरी दिल्या ... बहिणींचे शिक्षण सातवीपर्यंत झाले... आई—वडील शिकलेले नाहीत. पण आपल्या मुलांनी शिकावं ही त्यांची तळमळ होती. त्यामुळे घरच्या चाळीस एकर जमिनीत वडिलांनी आम्हाला कधी काम करु दिले नाही. तरीही १९७१—७२ च्या भीषण दुष्काळाने लहान भावाचा बळी घेतला. त्याला मध्येच शाळा सोडावी लागली...त्यावेळी मी अक्षरशः ढसढसून रडलोकी. आज नोकरी असल्याने मी, मोठे बंधू—आमची आर्थिक, कौटुंबिक स्थिती चांगली आहे. मुले व्यवसाय—नोकऱ्या करताहेत... लहान भावाची आर्थिक स्थिती तेवढी चांगली नाही. त्याच्या मुलाने काही बनावे म्हणून चौथ्या वर्गापासून मॅट्रीकपर्यंत माझ्या नोकरीच्या गावी ठेवले... पण त्याचा परिणाम शून्य... त्याचा मुलगाही शेतकरीच बनला... विदर्भामध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांच्या आत्महत्याचं प्रमाण पाहता, मला—मोठया बंधूना त्याच्याबद्दल नेहमी काळजी वाटते... आज वाटते, जर तो शिकला असता, नोकरीला लागला असता, तर त्याच्यावर ही वेळ आली नसती. त्याचा मुलगा शेतकरी बनला नसता. असो, हा काळाचा महिमा आहे.

प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत घेतल्यावर मॅट्रीकपर्यंत अनसिंग येथील प. दि. जैन विद्यालय शिकायला गेलो. मॅट्रीक पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी परभणीच्या श्री शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला...त्याचं प्रमुख कारण मोठे बंधू—श्री साहेबराव हे परभणी जिल्हयात प्रायमरी शिक्षक म्हणून कार्यरत होते... माझ्या शिक्षणाला त्यांचा फार मोठा हातभार लागला. प्रसंगी अडचण भोगून त्यांनी माझे शिक्षण पूर्ण केले...१९७३ मध्ये मी.बी. एस्सी (जीवशास्त्र) झालो. माझ्या सुदैवाने त्यावेळी नुकताच ९, १० वीचा अभ्यासक्रम बदलला होता. ९, १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान हे विषय अनिवार्य झाले. त्यापूर्वी ९ व्या वर्गातील मुलांना आर्ट्स, सायन्स, कॉमर्स यापैकी एखाद्या विषयाची निवड करता येत होती. नव्या व्यवस्थेत सर्व विधार्थ्यांना गणित, विज्ञान अनिवार्य झाल्याने बी. एस्सी. (जीव) पदवीधरांना एकाएकी मागणी आली. त्यामुळे श्री. पारेश्वर विद्यालय, पार्डी टकमोर ता. जि. वाशिम येथे दि. १९ जुलै १९७३ रोजी विज्ञानशिक्षक म्हणून रुजू झालो.

माझी पहिली कथा १९७० च्या दरम्यान नाशिकच्या दै. आपण मध्ये प्रकाशित झाली. आणि मग ७०—९० चं दशके कथाच लिहीत राहिलो. या काळात कविताही प्रकाशित होत होत्या. मी लेखक—कवी कसा झालो? मी १९६७ ला मॅट्रिक पास झालो. परभणीच्या शिवाजी कॉलेजमध्ये पुढील शिक्षणासाठी गेलो. ... त्यावेळी वडील बंधू चुडावा ( ता. वसमत जि. परभणी) येथील जि. प. हायस्कूलात शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या शाळेची लायब्ररी अतिशय समृध्द होती. माझे बंधू मला पुस्तके आणून देत. मी ती वाचत असे...अगदी खांडेकर, ना. सी. फडके, शिवाजी सावंत, रणजित देसाई, ना. स. इनामदार इ. महत्वाचे लेखक त्या काळात वाचले. वाचनाचा झपाटा फार मोठा होता. हाती पुस्तक घेतले की ते पूर्ण केल्याबिगर चैन पडेना... पण हा प्रकार पुढे हळू हळू कमी झाला. वाचतांना चिंतन सुरु झाले. कथा—कादंबरीलतला एखादा प्रसंग वाचला की त्यातल्या उणिवा जाणवत....हा प्रसंग अशाऐवजी असा मांडला असता तर... त्यातूनच मनात समांतर कथा सुरु होत जाई... अन् एक दिवस कथाच कागदावर उमटलीकृसाप्ताहिकात छापूनही आलीकृपण सत्तरच्या दशकात नुसतेच कथालेखन करत होतो... त्यात फारसं नाविन्य नसायचं... पाठवत होतो....आणि छापून येत होतं. ८० च्या दशकात सुरुवातीलाच डॉ. आनंद यादव यांनी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांच्या सहकार्याने तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा हा उपक्रम

जाहीर केला... मीही तीन कथा पाठविल्या... पण पुढे त्या तीनही कथा साभार परत आल्याकृसोबत यादवांचे सविस्तर पत्र.... ग्रामीण कथा गांभीर्याने कशी लिहावी, याबद्दलच्या सूचना... त्यातून त्यांच्याशी संवाद सुरु झाला... आणि अस्सल ग्रामीण कथालेखनाचा सूर मला गवसला... अनुष्टुभच्या रेड—कथा स्पर्धातून लागोपाठ चारवेळा बक्षीसे मिळवून महाराष्ट्रात सर्वदूर नाव पोचले... अनुष्टुभ्चा नियमित लेखक झालो...अस्मितादर्श, अक्षरवैदर्भीसारख्या अनेक मान्यवर मासिकांच्या दिवाळी अंकांचा मानकरी झाला...कथेस एक वनज प्राप्त झाले...

'वारुळ' सारख्या सामाजिक विषमतेचा संदर्भ असणाऱ्या कादंबरीचं अशा सामाजिक विषमतेवरच्या अनेक उत्कृष्ट कथा लिहिण्यासाठी सामाजिक भान प्राप्त झाले ते अस्मितादर्श आणि डॉ. गंगाधर पाननागवणे यांच्यामुळे... त्याकाळी अस्मितादर्श मधून माझ्या कथा—कविता प्रकाशित झाल्या की महाराष्ट्रभरातून वाचकांची पत्रे येत... त्यात सुरुवातीचा मायना 'आयुष्यामान' असा असे... म्हणजे ही मंडळी मला त्यांच्यापैकी एक समजत... आणि पुढे दिर्घकाळ याबाबत कोणाला कळलंही नाही... अर्थात यात मला काही लपवावयाचं कारण नव्हतं... जे घडलं ते माझ्याठिकाणी दलितांबद्दल असणाऱ्या सहानुभूतीच्या दृष्टीकोणामुळे... त्यामुळेच 'वारुळ' सारखी अत्यंत प्रक्षोभक विषयावर असणारी कादंबरी लिहितांना मी ती अतिशाय तटस्थपणे लिहू शकलो... त्यात कुठल्याही जाती—पातीबाबत एकांगीपण आला नाही...

१९८३ च्या दरम्यान मेहता पब्लिशिंग हाऊसने डॉ. यादव आणि डॉ. द. दि. पुंडे यांच्या सहकार्याने 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन केले... मोठया जिद्दीने, आत्मविश्वासाने मी 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीचे हस्तलिखित पाठविले... आणि 'तिसऱ्या पिढीची एकमेव कादंबरी' म्हणून ते हस्तलिखित स्विकारले गेले... पुढे कादंबरी प्रकाशित झाली.. या कादंबरीने उभ्या महाराष्ट्रात चर्चा घडून आणली.. खऱ्या अर्थाने मला लोकमान्यता मिळाली... पुढे 'पखाल', 'वारुळ' या कादंबऱ्यांना शासनाने पुरस्कारही दिले.... अशा प्रकारे लोकमान्यता आणि शासनमान्यता या दोन्ही गोष्टींचा मी धनी झालो.

**प्रश्न २)** सर! सद्या तुम्ही चांगले साहित्यिक आहात तुम्हाला साहित्य क्षेत्रात छोटे–मोटे पुरस्कार मिळाले आहेत तर तुमचा आवडता साहित्य प्रकार कोणता?

**उत्तर** याचं असं नेमकं उत्तर देता येणार नाही... कारण मी आतापर्यंत अनेक लेखन–प्रकार हाताळले आहेत... सुरुवात कवितेनं झाली... जवळपास शंभरके कथा महाराष्ट्रभरातील विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या.. त्यातील 'प्रश्न' नावाची कविता डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी संपादित केलेल्या 'दलित प्रेमकविता' या संग्रहात समाविष्ट आहे... तर त्याच कवितेचे भगवान ठग संपादित 'Dalit Poetry today' च्या एका volume मध्ये इंग्रजी भाषांतर झाले. मात्र पुढे कविता हातची निसटली... आणि पूर्णवेळ कथेकडे वळलो... ८०च्या दशकात मी कथालेखनात आकंठ बुडून गेलो होतो.. माझी कथालेखनातली दर्जेदार कथा ही याचकाळातली ... पुढे १९८५ साली 'हाल्याहाल्या दुधू दे' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली... आणि मग मला कादंबरी लेखनाने झपाटले... कथा थोडी मागे पडली ... पखाल (१९९५), वारुळ (२००४), पाटीलकी (२००५) अशा तीन कादंबऱ्या आल्या.... दोन–तीन कादंबऱ्या येण्याच्या मार्गावर आहेत... कथेसारख्या छोटया पटातून कादंबरीसारख्या मोठया पटात रमण्यात बरेही वाटे... सध्या 'प्रकाश ज्ञानबा काळे नावाचं षडयंत्र' नावाच्या कथेचं हस्तलिखित पूर्णत्वास येत आहे... कविता–कथा–कादंबरी या लेखन–प्रवासात मी अनेक पुस्तकांवर समीक्षा केली... लोक साहित्यावरील लेख लिहिले... दै. मातृभूमी, दै. लोकमत, साप्ताहिक महाराष्ट्र यासारख्या मान्यवर दैनिक साप्ताहिकांसाठी ललित स्वरुपाचे स्तंभलेखनही केले... जाने–फेब्रू २००५ मध्ये पत्नीसह मी काशी – गंगासागर – जगन्नाथ – रामेश्वर – कन्याकुमारी यात्रेला गेलो होतो... 'काशी ते कन्याकुमारी' या शीर्षकानं ते प्रवास वर्णन ही लिहिले... तेही प्रकाशनार्थ एका मान्यावर प्रकाशकडे दिले आहे... तशी अधून–मधून कथा–कविताही लिहितो...पण सध्या कादंबरीलेखनाकडे अधिक कल आहे... यातून अमूक एक साहित्यप्रकार आवडतो म्हणून सातत्याने तोच लिहितो... असे सुचित होत नाही... तर मनाला वाटेल तो साहित्यप्रकार हाताळंणे मला आवडते... अगदी अध्यात्मावर लिहायचाही माझा संकाच आहे. सारांश, जे लिहितो ते आवडीने आणि मन:पूर्वक लिहितो.

**प्रश्न ३)** मी आपल्या 'वारुळ' कादंबरीवर एम. फिल करीत आहे. तर कादंबरी लेखनाचा विचार करता आपले आवडते कांदबरीकार कोणते?

**उत्तर** हया प्रश्नाचं ही तसं नेमकं उत्तर देता येणार नाही... एककाळ असा होता की मी फक्त वाचायचंचे तेवढं काम केलं... अक्षरशः हजारो पुस्तकं वाचली... रणजित देसाईपासून अगदी बाबूराव अर्नाळकरांपर्यंत अनेक लेखकांचा फडशा पाडलाकृहया वाचनाने मला लेखनास प्रवृत्त केले हे खरे... पण अमूक एक साहित्य प्रकार लिहायाचा म्हणून त्या साहित्यप्रकारातील अमूक एका साहित्यिकाचे साहित्य वाचा ही बाब माझ्या बाबतीत घडले नाही... सुरुवातीचा कालखंड सोडला तर ऐन उमेदीच्या लेखनकाळात व अगदी अलिकडच्या काळातही वाचनाबाबत माझे कुपोषण झाले.... त्याची काही कारणेही आहेत... एक मी ज्या ग्रामीण भागात शिक्षक म्हणून कार्यरत आहे... तेथील शाळेत समृध्द वाचनालय नाही .. अलिकडे १०—१२ वर्षात सरकारने वेत्तनेतर अनुदान अजिबात बंद केले त्यामुळे वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करणे हा प्रकार बहुतेक शाळांतून बंदच झाला... शाळेमध्ये जी काही चांगली पुस्तके आहेत... ती मीच पुण्यावरुन खरेदी करुन आणली होती.. त्यात मृत्यूंजय, श्रीमान योगी जसे होते. तसे काही कथासंग्रह—कादंबऱ्यांही होत्या.. फ्रिडम ॲट मिडनाईट सारखं देशाच्या फाळणीचं भीषण वास्तव व्यक्त करणारं जाडजुडं पुस्तकही त्यापैकीच एक ... दुसरी गोष्ट गावात वाचनालय नाही... तिसरी गोष्ट जिल्हयाचे ठिकाण अंतरावर असल्याने नित्य जाणे—येणे नाही... त्यामुळे तेथील वाचनालयातून पुस्तके आणणेही इतके सहजसोपे नव्हते... त्यामुळे अमवस्या कादंबऱ्या वाचून अमकी कादंबरी लिहीली हे सांगणे अवघड आहे... खरं तर मी अवतीभोवतीची माणसे—जिवंत माणसे वाचतो.. त्यांचे राग—लोभ, द्वेष—अहंकार, सुख—दुःख इ. भावनांनी ग्रस्त झालेली माणसे कशी वागतात? एकमेकांना सहकार्य करतात; की एकमेकांवर कुरघोडी करतात? एकमेकांना फसवितात, की एकमेकांना अशा तऱ्हेची माणसं पुस्तकांतूनही वाचायला मिळत नाही.. माझ्या कथा—कादंबऱ्यांत हीच माणसं तुम्हाला जागोजागी आढळतील.. मात्र एखादे पुस्तक वाचावेसे वाटल्यास ते मी विकत घेऊन वाचतो, विकत न मिळाल्यास मित्रांकडून, वाचनालयांतून मिळवितो... आणि वाचतो... तरीही वास्तववादी कादंबरीलेखन करणारे कादंबरीकार मला आवडतात. त्यात डॉ. आनंद यादव, प्राचार्य रा. रं. बोराडे, अण्णाभाऊ साठे यांची नावे आवर्जून दयावी

लागतील. तशा श्री. ना. पेंडसे, चि. त्र्यं. खानोलकर, जयंत दळवी ही नावेही माझ्या दीर्घकाळ स्मरणात आहेत अलिकडच्या म्हणजे माझ्या समकालिनात नामदेव कांबळे, राजन गवस, रवींद्र शोभणे, सदानंद देशमुख हे महत्वाचे वाटतात...

**प्रश्न ४)** 'हाल्या हाल्या दुधू दे' 'पखाल' 'वारुळ' या कादंबऱ्यातून दलित ग्रामीण जीवनचित्रण येते. तर या कादंबरी लेखनाची प्रेरणा की मिळाली. (मुख्य 'वारुळ' कादंबरीच्या प्रेरणा कोणत्या?

**उत्तर** खरं तर मुळात मी ग्रामीण कथालेखन.. ऐशींच्या दशकात माझी कथा ऐन बहरात आली होती. एकाहून एक सरस अशा कथा मी लिहित होतो... त्याच काळात मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी डॉ. आनंद यादव आणि डॉ. द. दि. पुंडे यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमाचे पत्रक हाती पडले... त्याआधी त्यांनीच आयोजित केलेल्या 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' या उपक्रमात सहभाग घेऊनही मला यश मिळाले नव्हते; पण यावेळी मात्र त्या पराभवाचे उट्टे काढायचेच या निश्चयाने मी 'हाल्या हाल्या दुधू दे' च्या लेखनाकडे वळलो. कथानकाचा शोध घेण्याची गरजच नव्हती.. एवढं अवती भोवती भीषण वास्त्व पसरलेलं होतं... आजही आहे.. ग्रामीण भागातल्या कोणत्याही घरातल्या – ज्यांची परिस्थिती हलाखीची वा सर्वसाधारण आहे. कोणत्याही माणसांवर कादंबरी बेतता येते, असं चित्र आहे... आर्थिक कुचंबना, सामाजिक रुढी—परंपरा, सरकारी वा सहकारी पातळीवर होणारे शोषण, सावकारांनी केलेली पिळवणूक—छळवणूक... राजकीय नेते, उच्च अधिकारी यांच्या पातळयांवरची ग्रामीण भागाबद्दलची उदासिनता, व्यापरांनी जळवांसारखे शेतकऱ्यांच्या – कष्टकऱ्यांच्या रक्ताचे चालविलेल शोषण... किती किती विषय तुमच्यासमोर आव्हान देऊन उभे राहतात..? त्या सर्वांना स्पर्श करण्याचा जाणीपूर्वक प्रयत्न 'हाल्या हाल्या दुधू दे' मध्ये केलाकृतर 'पखाल', 'वारुळ' अलिकडची 'पाटिलकी' यांच्या प्रेरणा थोडयाशा वेगळया... ग्रामीण भागतील बलुतेदारी नव्या विज्ञानाने—तंत्रज्ञानाने पार मोडकळीस आणल... बारा बलुतेदार देशोधडीला लागले ... पिढयानापिढया चालत आलेले काम बंद झाले ... नवे काही करता येत नाही ... त्यामुळे अशा बलुतेदारांची जी घुसमट सुरु झाली तिचं चित्रण 'पखाल' मध्ये आणि काही अंशाने 'वारुळ' आणि 'पाटिलकी' मध्ये

आलेलं आहे ... “याशिवाय सामाजिक विषमता, त्यातून जाती—जमाती निर्माण होणारे ताणतणाव... सवर्णांनी अस्पृश्य ठरविलेल्या दोन जातींमध्येही 'आम्ही श्रेष्ठ, तुम्ही कनिष्ठ' हा अहंगंड निर्माण करणारा वाद ... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व अस्पृश्यानां एका धर्माच्या झेंडयाखाली आणण्याच्या प्रयत्नास बसलेली खिळ आणि त्यातून निर्माण झालेले संघर्ष, म्हणजे सवर्ण—दलित—दलित असा तीन पातळयांवरचा संघर्ष ... हे प्रत्यही दिसणारे वास्तव मला अस्वस्थ करीत होते ... त्यातूनच 'वारुळ' चा जन्म झाला.” मंडल आयोगाच्या निमित्ताने एका नव्या मन्वतराला सुरुवात झाली ... मागासवर्गीयांना नोकरी, सत्ता यात आरक्षण आले .. वंश परंपरेने ज्यांनी या सत्तेचा भोग घेतला, त्यांना या गोष्टीने हादरे बसले ... ज्याची हयात आपल्या गोठयातील शेण काढण्यात गेली .... तो माणूस गावाचा पाटील होते, हे सत्य पचविणं किती अवघड आहे, याचा पुरेपूर प्रत्यय माझ्या 'पाटिलकी' या कादंबरीतून येतो .... अर्थात माझ्या मागील आणि पुढील लेखनाच्या प्रेरणा दोन ओळींन सांगायच्या झाल्यास त्या अशा सांगता येतील —

'माझ्या भोवतीचे जन, माझी ओवी माझी गाथा ।
शतजन्म लाभो मला, त्यांच्या चितारण्या कथा' ।।

**प्रश्न ५)** तुमच्या कादंबऱ्यातील नायक व कांही मध्यवर्ती व्यक्तिरेखा तुमच्या कल्पनेतल्या आहेत की त्या तुम्ही पाहिलेल्या आहेत?

**उत्तर** काल्पनिक स्वरुपाचं लेखन मी आतापर्यंत केलं नाही .... पुढेही करता येईल असं वाटतं नाही. आधीच्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे मी माणसं वाचतो, ती पचवितो, मग त्या रसायनातून माझे नायक, उपनायक, नायिका, उपनायिका, कथा—कांदबऱ्यातील पूरक पात्रे निर्माण होतात .... खरं तर मी काहीच करत नाही .... लेखनास सुरुवात केली की हया विविध व्यक्तिरेखा अगदी अल्ला दिनच्या दिव्यातील भूताप्रमाणे माझ्या समोर हात बांधून उभ्या होतात .... मी त्यांना वाकवत नाही, त्याच मला वाकवितात .... कथानकाला आपोआप पुढं नेत राहतात .... त्यात सुष्ट प्रवृत्तीच्या जशा व्यक्तिरेखा असतात, तशा दुष्ट प्रवृत्तींच्या व्यक्तिरेखाही असतात .... हया व्याक्तिरेखा कुठून आल्या, त्या मला कुठे भेटल्या? मी त्यांचा शोध घेतला की त्याच मला शोधत आल्या? असल्या प्रश्नांना काहीच अर्थ उरत नाही .... सत्य हे की त्या व्यक्तिरेखा माझ्या समोर हात जोडून

उभ्या असता .... म्हणजे हया साऱ्या जणू माझ्या जगण्यांचाच एक भाग झालेल्या असतात .... म्हणूनच माझ्या कथा—कांदबऱ्या अस्सल, जिवंत वाटतात .... त्याचे प्रत्यंत्तर मला वाचकांच्या अभिप्रायातून होते .... माझी 'हाल्या हाल्या दुधू दे' ही कादंबरी त्या काळी म्हणजे १९८६ च्या दरम्यानं आकाशवाणी नागपूर वरुन नाटयीकरणाच्या रुपात सादर झाले होते त्याचा पहिलाच भाग जेव्हा माझ्या वडिलांनी ऐकला तेव्हा ते म्हणले 'हे समधं त्यानं आपल्या घरचचं लिहिलं .... ते काय ऐकायचं?' त्यानंतरचे भाग त्यांनी खरोखरच ऐकले नाही .... मी कथाकथनंही करतो .... एका ठिकाणी कथाकथनं करत असतानां आधार नावाची कथा मी सांगत होतो — माझ्या बाजूला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे एक नकलाकार वयोवृध्द ग्रहस्थ अक्षरश: हमसाहमसी रडायला लागले .... 'दावणीचा बैल' हया कथेतील अनुभव हा माझा स्वत:चा अनुभव आहे .... तो इतका अस्सल आहे की अनेकांनी तो आपलाच अनुभव असल्याचं कळविलं .... हिच गोष्ट माझ्या इतर कथा — कादंबऱ्यांबाबत आढळुन येते .... असा अभिप्राय देणारी ही माणसं जशी शहरी असतात तशीचं ग्रामीण ही असतात .... सुशिक्षित असतात तशीच अशिक्षित असतात .... अशिक्षित माणसांपर्यंत माझी कथा — कथाकथनांच्या माध्यामातून वा कथा वाचनाच्या अगदी सामुहिक वाचनाच्या माध्यामातून पोचली .... कांदबरी ही तशीचे पोचते .... 'हाल्या हाल्या दुधू दे' तर आकाशवाणी नागपूर मुळे दूरदूर वर खेडयापाडयात, शहरात पोचली .... माझी ही कथा कादंबऱ्यातील माणसं काल्पनिक आहेत. असं कोणी अजून तरी म्हटलं नाही .... कारण ती अस्सलंच आहे .... म्हणजे मला ती कथा कादंबऱ्यात आहे तशीच्यातशी भेटली का? नाही .... ती पूर्णांशाने जशीच्यातशी भेटली नाही .... पण कधीकधी आल्पाशाने वा कधीकधी अधिकांशाने ती मला भेटली. अशी जी भेटली ती माणसं पुन: कधीही वास्तव्यात भेटली की त्यांच्यावरुन माझ्या चैनकाल उतरलेली ती पात्रच माझ्यासमोर उभी राहतात .... ही माणसं माझ्यावर अशी अणंत उपकार करुन गेलेली आहेत त्याच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी मी माझा 'मोहरलेला चंद्र' हा कथासंग्रह मी माझ्या अवती भोवती वावरणाऱ्या हया सर्व सुष्ट—दुष्ट माणसांना अर्पण केला आहे .... किंवा हया माणसांना मी 'ओवी', 'गाथा' मानतो; ते याच भावनेतून ....

**प्रश्न ६)** 'वारुळ' ही एक वास्तववादी कादंबरी असून तिच्यातील 'प्रभू' ही व्यक्तिरेखा म्हणजे तुमचेच रुप की जवळपासची एखादी व्यक्तिरेखा आहे?

**उत्तर** आपल्या प्रश्नात आपण व्यक्त केलेल्या दोन शक्यतांपैकी पहिली शक्यता एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सत्य आहे. 'वारुळ' मधला पट हा १९५६ पासून १९८६ पर्यंत असा सलग ३० वर्षांचा पट आहे .... यातील पहिली पिढी परभूच्या वडिलांची .... दुसरी पिढी परभूची तर तिसरी पिढी त्याच्या मुलाची .... यातील दुसऱ्या पिढीचे म्हणजे परभूचे जीवन — वास्तव मांडतांना मला माझ्या शालेय जीवनांचा फार उपयोग झाला .... १९५८ साली मी पहिल्या वर्गात असेन .... कारण १९६७ साली मी मॅट्रीकपास झालो. त्यामुळे तत्कालिन शालेय वातावरण, ग्रामीण वातावरण, सवर्ण—दलित परस्परसंबंध, अस्पृश्यता, बुलतेदारीच्या प्रथा .... हया सर्व बाबी मी पहिल्या, अनुभवल्या, जवळून जोखलेल्या होत्या .... त्यामुळे 'वारुळ' कादंबरीमध्ये परभूच्या जीवनात रेखलेले काही प्रसंग हे माझ्याच जीवनात घडलेले प्रसंग होते .... उदा .... प्रभू एकदा टोपी न घालता किंवा डोळयाला धडुतं न बांधना दुकानावर जातो .... तेव्हा त्याला पाहून गावातला एक वृध्द माणूस त्याला 'काड्न बोडख रे? तुहा बाप मेला का काय? असं विचारतो .... हे माझ्याही बाबतीत घडलं होतं .... कारण त्याकाळी बोडकं राहणं म्हणजे बाप मरणं हे समीकरण मानलं जायचं .... मी रंगविलेली 'वारुळ' मधली चावडी मध्ये भरणारी शाळा, किंवा शाळेतलं वातवरण, शिक्षक हे माझ्याच तत्कालिन भावजीवनातील जसेच्या तसे आहेत .... पुढे माझी जसजशी समज वाढत गेली, अगदी तसाच परभूही वाढला .... एवढंच की चौथी पास झाल्यानंतर तो पुढे शिकू शकला नाही .... तरीही १९५६ ते १९८६ या कालखंडात एखाद्या खेडेगावात सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय वा धार्मिक स्वरुपाचे काय बदल होऊ शकतात, तसेच शासनाचे नियम—कायदे; त्यांचे परिणाम, राज्य, केंद्रस्तरावरचे बदलते अस्थिर राजकारण, जागतिक पातळीवरच्या काही महत्वपूर्ण घटना .... इ. बाबी मी डोळसपणे अनुभवत होतो .... त्यामुळे परभू उभा करायला मला अवघड गेला नाही .... मातंग समाजामध्ये असे अनेक परभू आपल्यास पाहायला मिळतात .... ते 'वारुळ' मधल्या परभूशी तंतोतंत मिळते—जुळते नसले तरी काही अंशी त्याच्यासारखेच असतात .... एकंदरीत माझा स्वानुभव आणि मातंग मंडळीतील काही 'परभू' मिळून 'वारुळ' मधला परभू उभा राहिला ....

**प्रश्न ७)** आपल्या कादंबऱ्यातून मानवी जीवनाची भूकेसाठी होणारी ससेहोलपट दिसते तर त्याविषयी आपले मत.

**उत्तर** जगातल्या सर्व लहानमोठया संघर्षाचे मूळ भूक हेच आहे .... भुकेच्या स्वरुपावर संघर्षाचे स्वरुप अवलंबून असते .... हया भुकेलाही अंत नाही .... आपले पोट भरल्यावरही उद्या—पखाच्या भुकेची तरतूद मानसं, राष्ट्र करतात .... त्यासाठी इतरांचे शोषण करण्यास ते मागेपुढे पाहात नाहीत .... भुक लागली की आपोआप ताट समोर येणं असं भाग्य फार थोडयांच्या नशिबी असते. किंबहुना ग्रामीण पातळीवर तेही मागासवर्गीयांच्या संदर्भात ते फारसे संभवत नाही. याची जी काही कारणे आहेत; त्यात आर्थिक साधनांची चणचण हे एक महत्त्वाचे कारण आहे .... आर्थिक साधने या मंडळींना प्राप्त होऊ नयेत, त्यांनी सदैव खितपतच पडावे, उपाशी व अर्धपोटीच राहावे, अशी व्यवस्थाही अतिशय पध्दतशीरपणे वर्णवाद्यांनी करुन ठेवली होती .... तुम्ही शूद्र .... तुम्हाला धनसंचयाचा अधिकार नाही .... तुम्ही इतर वर्णांची सेवा करायची .... त्याबद्दल त्यांच्याकडून मिळेल ते उष्टे—पाष्टे, शिळे—पाके घेऊन त्यावर गुजराण करायची .... वर्णव्यवस्थेत त्यांच्या नशिबी जी ढोर कामे आली, त्याचा जेवढा मोबदला मिळायला पाहिजे .... तो मात्र मिळत नव्हता .... गाडीभर लाकडे फोडून देण्याच्या बदल्यात ५—१० ओळीचं पत्र वाचून दिले जाई .... शोषणं व्यवस्थेचं हे विदारक रुप हाये .... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हया गोष्टींची जाणीव झाली .... आणि त्यांनी दलितांना हया कष्टप्रद, अपमानास्पद, अभावशून्य स्थितीतून बाहेर काढण्यासाठी धर्मपरविर्तन दलितांनी आवाहन केलं .... तेव्हा उच्चवर्णियातली शहाजाग मंडळी म्हणाली, 'बाबासाहेब, तुम्ही तुमच्या समाजाचे फार मोठे आर्थिक नुकसान करत आहात .... मेलेल्या एका ढोराचे कातडे विकले तरी पाच — पन्नास रुपये सहज हाती पडतील .... याचा तुम्ही विचार केलेला दिसत नाही.' त्यावर बाबासाहेब म्हणाले होते. 'माझ्या समाजाची चिंता तुम्ही करु नका .... हा धंदा फायद्याचा आहे असं वाटत असेल तर तो तुम्ही करा ....' एखादा मागासवर्गीय पोटभर खातो वा पोटभर खाण्यासाठी धडपड करतो ही बाबच उच्चवर्णियांना खटकणारी होती .... प्रश्न असाही निर्माण होतो की एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मास आले नसते तर दलितांची आज काय गत असती? .... खरं आहे .... मुळातच अज्ञान, त्यातून

निर्माण झालेली जडत्वाची भावना, त्यातून अंगी बाळलेला आळस .... हया बाबी 'जैसे थे' स्थितीत राहण्यास अनुकुलता दर्शविणाऱ्या होत्या .... हा 'जैसे थे' वाद झटकून, अंग झाडून, उभे व्हायला, स्वकष्टाने, स्वाभीमाने कमावलेली रोजी रोटी खाण्यालाच बाबासाहेबांनी दलितांना प्रेरित केले .... लाचारी, हाजी हाजी, लाळघोटेपणा, सोडायला आणि नव्या क्रांतीचा, नव्या युगधर्माचा, नवा अविष्कारी 'बुध्द' बाबासाहेबांनी दलितान उभा केला .... येथे त्यांच्या भुकेची ससेहालपट संपली .... स्वकष्टाने कमावू, खाऊ. अन्यथा आनंदाने उपाशी राहू .... ही नवी नीतीमत्ता दलितांना गवसली .... मात्र मातंग समाज बाबा – साहेबांनी आवाहन करुनही त्यांच्यासोबत गेला नाही .... उलट मूळात होता त्यापेक्षा अधिकगर्तेत पडला .... महारांनी टाकलेली मेलेली गुरंढोर ओढण्याची, त्यांची कातडी सोलण्याची, त्यांचचं मांस खाण्याची म्हणजे भुकेला आणखी हीन पातळीवर नेण्याची दयनीय अवस्था मातंगांनी आपणहून स्वीकारली .... त्यामुळे मातंगांची आणखी पिढया बरबाद झाल्या .... 'वारुळ' मधल्या भुकेचं हे विदारक रुप आहे . ... इतर कादंबऱ्यांतही ते कमी अधिक प्रमाणात येते .... हे सारे वास्तव आहे .... ते नाकारता येणारं नाही.

**प्रश्न ८)** 'वारुळ' मध्ये बौध्द–मातंग समाजाचा संघर्ष आला आहे व मातंग–मातंग संघर्ष आला आहे. याविषयी आपले मत.

**उत्तर** दोन माणसं एकत्र आली की संघर्ष अटळ आहे .... आई आणि मुलगी गुण्यागोविंदाने एकत्र राहू शकत नाही .... मग दोन भिन्नलिंगी, भिन्नजातीय, भिन्नधर्मीय माणसे अपवाद कसे ठरतील? स्ववर्चस्वाची जाणीव ही असल्या संघर्षाची मूळ भूमी आहे .... त्यातून वर्णाश्रम व्यवस्था अथवा अलिकडे वर्गकलह–व्यवस्था अस्तित्वात आली. भुकेचा संघर्ष मुळातला पहिला संघर्ष आहे. तो संपविण्याची पराकाष्ठाा–धडपड जो तो आपापल्या परीने करतो .... हे होत असतांनाचा वर्चस्वाचा लढाही सुरुच राहतो. वर्णव्यवस्थेमध्ये सर्वात हीन, खालची पातळी ज्यांच्या वाटयाला आली–वरुन अस्पृश्य, क्षुद्र ही विशेष नामांकने प्राप्त झाली .... त्यांना खरं तर संघर्षाची गरजच नव्हती .... हया बाबींची जाणीव दलितांना वेळीच झाली असती तर जाती–जातीतील किंवा जातीअंतर्गत संघर्ष निर्माण झालाच नसता .... पण अहंकार माणसाला स्वस्थ बसू देत नाही ....

दुसऱ्यापेक्षा आपण कसे श्रेष्ठ, वरचढ आहोत, हे दाखविण्याची कुठलीच संधी माणूस सोडत नाही .... त्यातूनच बौध्द—मातंग संघर्ष निर्माण झाला आहे .... बौध्द म्हणजे पूर्वाश्रमीचे महार स्वत:ला मातंगांपेक्षा श्रेष्ठ मानतात .... मातंग हे आपल्यापेक्षा हीन, खालचे .... आपली त्यांची बरोबरी नाही .... त्यामुळे त्यांच्यादारी याचक म्हणून जाणे वा त्यांच्या सोबत पंगतीला बसणे हा आपला अपमान आहे असं त्यांना वाटणं स्वाभाविक आहे .... डॉ. बाबासाहेबांना महाराशिवाय इतर दलितांनीही बौध्दधर्म स्वीकारावा असं वाटत होतं .... पण प्रश्न असा आहे की डॉ. बाबासाहेबांसारखं सर्वच महारांना वाटत होतं का? याचं उत्तर निश्चितचं 'नाही' असं आहे. मात्र सवर्णांच्या नजरेन महार, मातंग हे एकाच पातळीवरचे होते .... वास्तविक या वास्तवाची त्यांना जाणीव व्हायला हवी .... त्यातून सवर्ण विरोधी धार अधिक तीव्र व्हायला हरकत नव्हती .... पण या वास्तवाकडे पध्दतशीरपणे डोळेझाक करत संयुक्तिक संघर्षाला फाटाच दिला गेला ....

मातंग—मातंग संघर्ष हेही एक वास्तवच आहे. इथे भूक ही मूळ प्रेरणा आहे. मला अमूक इतका वाटा मिळाला पाहिजे, त्याला माझ्यापेक्षा कमी वाटा मिळाला पाहिजे असं या संघर्षाचं स्वरुप होतं .... वर्चस्वाची भावना ही नंतरची .... पण भूक आणि वर्चस्वाची जाणीव या दोन गोष्टींनी मातंग—मातंग संघर्षाची नांदी घातली .... त्यातूनच भीमासारखं उपद्व्यापी व्यक्तिमत्व उदयाला आलं .... परभू याबाबतीत शहाणा आहे .... जाती—संघर्षापेक्षा वाजाती अंतर्गतासंघर्षापेक्षा अस्तित्वाचा लढा हा महत्वाचा आहे, याची त्याला जाणीव असते .... त्यामुळे गावातील बौध्द मंडळी वा भीमासारखी स्वजातीची माणसं यांकडे तो कानाडोळा करतो आणि 'माणूसकी' या एकाच मूल्यावर आधारित संघर्षाला तो महत्व देतो ...

**प्रश्न ९)** परिवर्तनवादी चळवळी विषयंक आपली भूमिका कादंबरीतून स्पष्ट होते. परंतु त्याविषयी तुमचं मत.

**उत्तर** एखाद्या व्यक्तीचं, संस्थेचं, समाजाचं परंपरांगत वर्तन जेव्हा प्राप्त परिस्थितीत कालबाहय ठरते तेंव्हा परिवर्तनाची आवश्यकता असते. हे वर्तनबदल सहज, आपोआप होत नाही, हेही तेवढेच खरे. वर्तनबदल व्हावा ही तीव्र अपेक्षा करणारा कोणीतरी अग्रणी असतो .... कधी कधी तशा पध्दतीचं ध्येय साकारण्यासाठी

धडपडणारा समूहही असतो .... या व्यक्तिला, समूहला खूप धडका द्याव्या लागतात त्यात कधीकधी परिवर्तनवाद्यांच्या पिढयांमागून पिढयाही बरबाद होतात; तरी उदिष्ट प्राप्त होत नाही .... ही जेंव्हा जोर धरते तेंव्हा तिच्याविषयी आपुलकी बाळगणारे आपापल्या स्थानी विचलित वा अस्वस्थ झालेले असतात. चळवळीचा यशापयाशाने ते मनाने दोलायमान होतात .... मी ही असाच प्रत्यक्ष चळवळीशी सबंध नसणारा, पण चळवळीबाबत आस्था असणारा माणूस आहे... त्यामूळं परिवर्तनवादी चळवळीचा चढना–उतरता आलेख मी लक्षपूर्वक पाहत असतो. मागासवर्गीयांच्या चळवळी या माझ्यासाठी विशेष आस्थेच्या बाबी आहेत...म्हणून मी माझ्या अनेक कथांमधून, पुढे कादंबऱ्यांमधूनही चळवळीबाबत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लेखन केलेले आहे... पण कथांपेक्षा कादंबरीमध्ये ते ठळकपणे लक्षात येते.

'पखाल' मधला परंपरेन पखालीचं पाणी भरणारा आणि बलुतं मिळविणारा कोळी समाज नव्या काळाच्या ओघात हतबल होतो... शिक्षण, नोकऱ्या, राजकारण याबाबतीत आपल्याला सरकारकडून पुरेसं संरक्षण मिळाव,यासाठी कोळयांची राज्यपातळीवरची संघटना सरकारच्या विरुध्द मेळावे,मोर्चे,उपोषणं या स्वरुपांत आदोलन उभ करते... वास्तवातील ही संघटना, तिचं कार्य दलित चळवळीएवढं सर्वलक्ष्मी नाही .... पण क्षीण स्वरुपात का होईना, ते कुठेना कुठे चालू आहे .... समाजातल्या इतर जातिधर्मांच्या घटकांना जरी ते ज्ञान नसेलं; तरी त्या त्या जातीतीलं जातिबांधवांना ते ज्ञान असते .... कोळयावर कादंबरी लिहायला घेतली तेव्हांच चळवळीची दखल घ्यायची मला आवश्यकता वाटली. आजच्या घडीला संघटित नाही असा कुठला तरी समाज असेल का? संघटन आणि त्यातून प्रगट होणारी शक्ती याचं भान त्या त्या समाजातल्या धुरिणांना असल्यामुळे ते संघटनांमार्फत चळवळींना जिवंत ठेवतात. कधी कधी त्यात त्यांचा स्वार्थही दडलेला असतो .... तो दुर्लक्षित करुन चळवळीची आवश्यकता लक्षात घेणं आवश्यकता असते .... 'वारुळ' मध्ये तर बौध्दांच्या, मातंगाच्या समग्र चळवळीचा इतिहास मी उभा केला आहे .... चळवळीशिवाय बौध्द वा मातंग समाज उभाच राहू शकत नाही ही त्यामागची माझी भूमिका आहे .... अगदी 'हाल्या हाल्या दुधू दे' मध्ये मी दुरावयाने का होईना तत्कालिन शेतकरी संघटनने सुरु केलेल्या चळवळीचा उल्लेख केलेला आहे .... 'पाटीलकी' मध्ये तर मंडळ आयोग हीच मोठी देशव्यापी चळवळ होती .... 'होय रे' अन् 'नाही रे' चे दोन तट त्याकाळात

देशभरात उभे ठाकले .... त्यानंच तत्कालिक पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांचचं सरकार खाली खेचलं .... अलिकडे म्हणजे गेल्या ७–८ महिन्यापूर्वी मंडल आयोगावरुनच पुनः एकदा देश पेटला .... उच्च तम शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांना आरक्षण मिळेल असे केंद्रीयमंत्री (मानवसंसाधन) अर्जुनसिंग यांनी जाहीर केले. अन् सगळा भारत समर्थकांच्या आणि विरोधकाच्या संघर्षज्वालांनी होरपळून निघाला .... प्रस्थापितांनी वंचितांना नाकारणे हे तत्व या चळवळीच्या बुडाशी दिसते .... त्यातूनच संघर्ष निर्माण होतात .... मी एक संवेदनशील लेखक असल्याने कथा–कांदबऱ्यांचे लेखन करतांना अशा चळवळींचे संदर्भ जरासे धरावेच लागतात ....

**प्रश्न १०)** आपली एक कविता वाचायला मिळाली तुम्ही किती? व कोणत्या विषयावर कवितांचे लेखन केले आहे?

**उत्तर** फसलेला वा कसलेला लेखक मूळात कवी असतो म्हणतात. हे जर खरे असेल तर मी ही मूळात कवीच आहे. अगदी पहिल्यांदा मी कविता लिहिली .... नंतर मात्र कवितेसोबत कथा ही लिहायला लागलो. जी पहिली कविता मी लिहिली मी 'चक्र' या नावाची .... तिचा विषय समाजिक विषमता हा होता .... बऱ्याचदा काव्यलेखनाची सुरुवात प्रेम कवितेने होते .... माझे मात्र तसे झाले नाही. प्रेमकविता मी लिहिलीच नाही असेही .... लिहिली .... अगदी उत्तान स्वरुपाची लिहिली; पण तीन विशेष रमलो नाही .... त्याचं कारण मी अशा कोण्या लावण्यावतीवर प्रेम करु शकलो नाही. कविता लिहिण्याचा वयात म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण घेतांना माझी शारीरिक स्थिती अतिशय किरकोळ होती .... आर्थिक स्थिती तर फारच खलावलेली होती .... त्यामुळे 'चमकणे' हा प्रकार मला करता आला नाही .... मी जी प्रेमकविता लिहिली, तिच्यातल्या बहुतेक कवितांना समाजिक विषमतेचीच झालर होती .... त्यामुळेच की काय डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी संपादिलेला 'दलित प्रेमकविता' या संग्रहात माझी 'प्रश्न' नावाची कविता त्यांनी संग्रहित केली .... प्रेम, सामाजिक विषमता, निसर्ग, शेती, स्त्री दाक्षिण्या इ. अनेक विषयांवर मी कविता लिहिला आहेत .... त्यापैकी जवळपास १०० च्या जवळपास कविता प्रकाशित झाल्या आहे .... कवितासंग्रह काढण्याबाबत मात्र फारसा उत्साह दाखविला नाही ....

**प्रश्न ११)** आपण अलिकाडच्या काळात काय लिहिले आहे व सध्या काय लिहित आहात.

**उत्तर** पाटीलकी ही कादंबरी २००६ मध्ये आलेली शेवटची प्रकाशित कादंबरी . ... अजून 'ठिणग्या' ही कादंबरी .... 'मृदंग' हा ललित लेखसंग्रह, 'विहिर' हा कथा संग्रह; काशी ते कन्याकुमारी हे प्रवासवर्णन यायचे आहे .... सध्या प्रकाश ज्ञानाबा काळे नावाचं षडयंत्र नावाची कादंरी लिहित आहे. ती लवकरच पूर्ण होईल .... याशिवाय प्रासंगिक स्वरुपाचे लेखनही चालूच आहे. त्यात कांही पुस्तकांचे परीक्षण ही आहे ....

पुढच्या जून २००७ मध्ये मी सेवानिवृत्त होत आहे. सेवानिवृत्तीनंतर बरंच काही लिहायचं आहे. पाहू या काय होते ते.

**बाबाराव मुसळे**